

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६९। किंमत - २ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | गुरूवार ०५/११/२०२६ । पाने- ४



संगमनेरमध्ये गोवंश तस्करीचा पर्दाफाश



संगमनेर : गोवंशीय जनावरांची कत्तलीच्या उद्देशाने अवैध वाहतूक होत असल्याचा प्रकार संगमनेर तालुका पोलिसांनी उघडकीस आणला आहे. संगमनेर-लोणी रोडवरील कोल्हेवाडी फाटा, वडगाव पान येथे पोलिसांनी धडक कारवाई करत एका कंटेनरमधून २७ गोवंशीय बैलांची सुटका केली. या कारवाईत १५ लाख रुपये किमतीचा कंटेनर आणि १० लाख ८० हजार रुपये किमतीची जनावरे असा एकूण २५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी कर्नाटकातील एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास संगमनेर-लोणी रोडवरील कोल्हेवाडी फाटा, वडगाव पान परिसरात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याची बाब समोर आली. यावेळी अशोक लेलँड कंपनीच्या विटकरी रंगाच्या कंटेनरमधून गोवंशीय बैलांची दाटीवाटीने वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. सदर कंटेनरमध्ये पांढरे, काळे, काळे-पांढरे तसेच विटकरी रंगाचे एकूण २७ बैल आढळले. प्रत्येकी ४० हजार रुपये अंदाजे किंमत असलेल्या या जनावरांचे एकूण मूल्य १० लाख ८० हजार रुपये आहे. तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला अशोक लेलँड कंटेनर (क्रमांक पी.जी.०७ यू ०३२६) याची किंमत (पान ३ वर)



जिल्हा बँकेवर सहकार विकास आघाडीचे निर्विवाद वर्चस्व



थोरात- विखे एकजुटीवर सभासदांची विश्वासाची मोहोर

युवावार्ता (प्रतिनिधी) : संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सहकार विकास आघाडीने ऐतिहासिक आणि अभूतपूर्व यश संपादन करत १८ पैकी तब्बल १७ जागांवर विजय मिळविला आहे. जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या निवडणुकीत आघाडीने आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले असून, विखे-थोरात यांच्या राजकीय एकजुटीवर जिल्ह्यातील शेतकरी, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी आणि बँकेच्या सभासदांनी विश्वासाची ठाम मोहोर उमटविली आहे. या निकालामुळे जिल्ह्याच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रात सहकार विकास आघाडीच्या नेतृत्वाची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, माजी मंत्री शंकरराव गडाख, चंद्रशेखर घुले यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांच्या एकत्रित नेतृत्वाला मिळालेली ही मोठी पावती मानली जात आहे. अनेक मतदारसंघांतील मोठे मताधिक्य आणि निवडणुकीपूर्वी झालेल्या बिनविरोध निवडी यामुळे आघाडीच्या संघटनात्मक ताकदीचे दर्शन घडले आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक ही केवळ संचालक निवडीची प्रक्रिया नव्हती, तर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे नेतृत्व, राजकीय समन्वय आणि संघटनशक्तीची प्रतिष्ठेची लढाई होती. या पार्श्वभूमीवर सहकार विकास आघाडीने सुरुवातीपासूनच एकजुटीची भूमिका घेतली. तालुकानिहाय नियोजन, सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींशी संपर्क, स्थानिक नेतृत्वातील समन्वय आणि कार्यकर्त्यांची मजबूत फळी या रणनीतीच्या जोरावर आघाडीने निवडणुकीत निर्णायक आघाडी मिळविली.

जिल्ह्याच्या राजकारणात विविध काळात स्वतंत्र प्रभाव निर्माण करणाऱ्या विखे आणि थोरात यांच्या नेतृत्वाने सहकार क्षेत्राच्या हितासाठी एकत्रित भूमिका घेतल्याने या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. या एकजुटीला मतदारांनी दिलेला प्रतिसाद निकालातून स्पष्ट झाला आहे.


निवडणूक प्रक्रियेत संगमनेरमधून रणजीतसिंह देशमुख, नेवासा येथून शंकरराव गडाख, राहाता येथून डॉ. सुजय विखे पाटील, श्रीरामपूरमधून करण ससाणे, पाथर्डीतून आमदार मोनिका राजळे, शेवगावमधून राजश्री घुले पाटील, श्रीगोंद्यातून दत्तात्रय पानसरे, कोपरगावमधून बिबिन कोल्हे, नगर तालुक्यातून अक्षय कर्डिले आणि बिगरशेती मतदारसंघातून सचिन जगताप यांची बिनविरोध निवड झाली. विविध तालुक्यांतील प्रमुख नेतृत्वाने आघाडीला दिलेली (पान ३ वर)











संपादकीय...

कृत्रिम बुद्धिमत्ता : संधींचे नवे दालन की रोजगारापुढील आव्हाने ?

आजचे जग तंत्रज्ञानाच्या वेगवान परिवर्तनातून जात आहे. काही वर्षांपूर्वी कल्पनाविलास वाटणाऱ्या अनेक गोष्टी आज प्रत्यक्षात उतरल्या आहेत. मोबाईल, इंटरनेट, संगणक आणि डिजिटल क्रांतीनंतर आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (-ख) मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वेगाने प्रवेश करत आहे. माहिती शोधण्यापासून लेखन, भाषांतर, वैद्यकीय निदान, शिक्षण, उद्योग, शेती, बँकिंग आणि प्रशासनापर्यंत सर्वत्र कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या या नव्या पर्वाने विकासाच्या असंख्य संधी निर्माण केल्या असल्या, तरी दुसरीकडे रोजगाराच्या भवितव्याबाबत गंभीर प्रश्नही उपस्थित केले आहेत. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी प्रगतीची नवी वाट आहे की बेरोजगारीचे नवे संकट, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रचंड माहितीचे विश्लेषण करण्याची, त्यातून निष्कर्ष काढण्याची आणि अल्पावधीत गुंतागुंतीची कामे पूर्ण करण्याची क्षमता. पूर्वी एखादे काम करण्यासाठी तासन्तास लागायचे, ते काम आता काही मिनिटांत पूर्ण होऊ शकते. उद्योग क्षेत्रात उत्पादनाचे नियोजन, गुणवत्तेची तपासणी, ग्राहक सेवा आणि व्यवस्थापन अधिक प्रभावी होत आहे. वैद्यकीय क्षेत्रात आजारांचे निदान, वैद्यकीय प्रतिमांचे विश्लेषण आणि संशोधनाला गती मिळत आहे. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार अभ्यासक्रम तयार करणे, भाषांतर करणे आणि ज्ञान सहज उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे. शेतीमध्ये हवामानाचा अंदाज, मातीचे विश्लेषण, पिकांवरील रोगांची ओळख आणि पाणी व्यवस्थापनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग होऊ शकतो. म्हणजेच योग्य वापर केल्यास हे तंत्रज्ञान मानवी जीवन अधिक सुलभ आणि कार्यक्षम बनवू शकते. मात्र, या प्रगतीच्या दुसऱ्या बाजूकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने अनेक कामे मानवी हस्तक्षेपाशिवाय होऊ लागली आहेत. माहिती संकलन, डेटा एन्ट्री, प्राथमिक लेखन, ग्राहक सेवा, भाषांतर, लेखा व्यवस्थापन अशा अनेक क्षेत्रांतील पारंपरिक कामांचे स्वरूप बदलत आहे. कंपन्यांना कमी वेळेत अधिक काम आणि कमी खर्चात उत्पादन अपेक्षित असल्याने त्या स्वयंचलित तंत्रज्ञानाकडे वळत आहेत. याचा परिणाम भविष्यात काही नोकऱ्यांच्या संख्येवर होऊ शकतो. विशेषतः ठरावीक स्वरूपाची पुनरावृत्ती होणारी कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांसमोर आव्हान निर्माण होणार आहे. त्यामुळे केवळ पदवी मिळविणे पुरेसे राहणार नाही, तर बदलत्या तंत्रज्ञानानुसार स्वतःला सक्षम बनविणे अनिवार्य ठरणार आहे. या बदलाचा सर्वाधिक परिणाम तरुण पिढीवर होण्याची शक्यता आहे. आज लाखो विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या शोधात आहेत. अशा परिस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे पारंपरिक रोजगाराच्या संधी कमी झाल्या, तर बेरोजगारीचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. मात्र, प्रत्येक तांत्रिक क्रांतीच्या काळात रोजगाराचे काही जुने प्रकार संपले आणि नवे रोजगार निर्माण झाले, हा इतिहासही लक्षात घ्यायला हवा. संगणकाच्या आगमनानंतर अनेकांना नोकऱ्या संपतील अशी भीती वाटत होती; परंतु माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर, डिजिटल सेवा आणि ऑनलाइन व्यवसायांची नवी क्षेत्रे निर्माण झाली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही असेच घडू शकते. एआय तज्ज्ञ, डेटा विश्लेषक, सायबर सुरक्षा तज्ज्ञ, मशीन लर्निंग अभियंते आणि डिजिटल तंत्रज्ञान प्रशिक्षक अशा नव्या रोजगार संधी निर्माण होत आहेत. प्रश्न केवळ रोजगार संपण्याचा नाही, तर रोजगाराचे स्वरूप बदलण्याचा आहे.

ज्येष्ठ समाजसेवी ऋषितुल्य व्यक्तिमत्व- कै. बाबुराव देशमुख



अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्याच्या ठिकाणापासून दक्षिणेला तीन मैलावर असलेल्या धामणगाव आवारी गावाची ओळख सर्वदूरपर्यंत आहे. सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक, शैक्षणिक आणि साहित्य क्षेत्रात या गावात आपल्या कर्तुत्वाने हिमालयाच्या उंचीची माणसे होऊन गेली. त्यातील एक ज्येष्ठ समाजवादी ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व म्हणजे कै. बाबुराव बाळाजी देशमुख आधुनिक ज्ञानव्यवहाराची परिवर्तनग्राही चिकित्सा यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही,ज्ञान हीच खरी संपत्ती आहे ही संपत्ती ग्रंथाच्या वाचनातून मिळते त्यासाठी प्रत्येक गावात ग्रंथालय असणे ही राष्ट्रीय गरज आहे,ग्रंथालय ही लोकशिक्षणाची केंद्र आहेत. त्यातून समंजस व जबाबदार नागरिक घडतात,विवेकी समाज निर्मितीसाठी ग्रंथालयाशिवाय पर्याय नाही हा विचार त्यांच्या संपूर्ण कार्यातून दिसून येतो

स्व.बाबुराव बाळाजी देशमुख यांचा जन्म ३१ऑगस्ट १९२३रोजी अकोले तालुक्यातील धामणगाव आवारी या ठिकाणी मातोश्री लक्ष्मीबाई व पिताश्री बाळाजी यांच्या पोटी झाला.आई-वडिलांनी मोलमजुरी करून त्यांना शिकविले.इयत्ता चौथी पर्यंतचे शिक्षण धामणगाव आवारी तर पुढील इयत्ता सातवी पर्यंतचे शिक्षण अकोले येथे झाले. १९४२ मध्ये इयत्ता सातवी पास झाल्यानंतर कोतुळ आणि नाचणठाव या ठिकाणी प्राथमिक शिक्षकाची नोकरी केली मात्र या नोकरीत त्यांचे मन रमले नाही त्यांनी अल्पावधीतच नोकरीचा राजीनामा दिला आणि मुंबईची वाट धरली. मुंबईमध्ये श्री.दहीतुले यांच्या मनोहर बुक डेपो मध्ये काही काळ काम केले.त्यानंतर स्व रामभाऊ ठमाजी आवारी हे काम करत असलेल्या ऑइल कंपनीत नोकरी केली.नोकरी करत असतानाच शिक्षणाची ओढ मात्र कायम होती, दिवसभर काम करून रात्रीच्या वेळेला पुढील शिक्षणासाठी नाईट हायस्कूलमध्ये प्रवेश घेऊन एसएससी पर्यंतचे शिक्षण १९४६मध्ये पूर्ण केले. पुढे हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन कंपनी, ब्रह्मासेल या नामांकित कंपन्यांमध्ये जबाबदारीच्या पदावर त्यांना नोकरी करण्याची संधी मिळाली.

सामाजिक कार्याची आणि शिक्षणाची ओढ मात्र या काळात त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. सामाजिक भान ठेवून अनेक समाज परिवर्तनाच्या चळवळीमध्ये त्यांनी भाग घेतला.मुंबईत साक्षरता प्रसार,भाडेकरूंच्या न्याय हक्कासाठी भाडेकरू संघटनेची स्थापना केली.तसेच त्यांनी संयुक्त महाराष्ट्र लढ्यातही सक्रीय सहभाग घेतला त्याबद्दल त्यांना रविवार दिनांक २ मे २०१० रोजी संगमनेर येथे संयुक्त महाराष्ट्र लढा कार्यकर्ता पुरस्कार मिळाला. १९४६ साली मुळा नदीला आलेल्या पुरामुळे राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले,त्या पूरग्रस्तांना मुंबईतून मदत करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. १९६९मध्ये संगमनेर -अकोले तालुका स्नेहवर्धक संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष होते १९७२मध्ये महाराष्ट्रात प्रचंड मोठा दुष्काळ पडला त्यावेळी या संघटनेने संगमनेर कॉलेजचे पाच गरीब होतकरू विद्यार्थी तत्कालीन प्राचार्य कौंडिन्यमामा यांच्या सहकार्याने दत्तक घेतले या विद्यार्थ्यात धामणगाव आवारीचे कचरूपाटील आवारी हे देखील होते.पुढे अकोले च्या कला वाणिज्य महाविद्यालयासाठी या संघटनेने सव्वा लाख रुपयांची मदत केली, या कामी दादासाहेब रुपवते डॉ.डी के सहाणे यशवंत सोनार, लालचंद शहा यांचे सहकार्य लाभले.त्यामुळेच स्वर्गीय बाबुराव देशमुख यांना अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीवर सहा वर्ष कार्यकारणी सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

अहमदनगर जिल्हा सहकारी सोसायटी,अहमदनगर जिल्हा फेडरेशन संस्था,अगस्ति संगम सहकारी पतसंस्था,यशोमंदिर पतसंस्था, अहमदनगर जिल्हा अर्बन पीपल्स बँक लिमिटेड मुंबई, दि .महानगर सहकारी बँक या सर्व आर्थिक सहकारी संस्थांच्या उभारणीमध्ये त्यांनी अत्यंत भरीव योगदान दिले आहे.

१९८२ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी आपले मूळ गाव गाठले.मातीचे ऋण फेडण्याची त्यांची ओढ त्यांना पुन्हा आपल्या जन्म गावी घेऊन आली. गावी परतल्यानंतर त्यांनी स्थानिक राजकारणाला आणि समाजकारणाला एक वेगळी दिशा दिली. १९८४सालीधामणगाव आवारी ग्रामपंचायतची निवडणूक लढविली, आणि गावकऱ्यांच्या विश्वासापोटी त्यांनी सरपंचपदाची धुरा सांभाळली. शासकीय पाणीपुरवठा योजना, रस्ते आणि शिक्षण यासारख्या मूलभूत सुविधांवर त्यांनी विशेष भर दिला. गावाला आत्मनिर्भर बनविण्यासाठी त्यांनी ग्रामस्थांमध्ये सहकार्याची भावना रुजवली. पुढे काही तात्विक मतभेद झाल्यामुळे त्यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिला.

१९८९ साली जनता दलाचे अकोले तालुका अध्यक्ष झाले. याकामी साथी दशरथराव सावंत, सखाराम येलमामे, सावळेराम दातीर आणि स्व. किसन हनुमंता आवारीयांनी साथ दिली.

१९९० मध्ये प्राचार्य मोरे यांच्या पुढाकाराने इंडो जर्मनचे फादर बाकर यांना गाव दत्तक घेण्यास भाग पाडले त्यामुळे गावाचा कायापालट झालेलेला दिसून येतो. त्यांच्या जीवनातील सुवर्णपान म्हणजे गावात सुरु झालेले भारतरत्न राजीव गांधी विद्यालय. आणि या विद्यालयाची भव्यदिव्य इमारत. विद्यालयाच्या स्थापनेवेळी मंत्री मधुकररावजी पिचड साहेब यांचे सहकार्य लाभले .स्वतःला शिक्षणासाठी करावा लागलेला संघर्ष याची जाणीव त्यांना होती. गावातील एकही मुलगा - मुलगी शिक्षणापासून वंचित राहू नये असा त्यांचा दृढ निश्चय होता. या संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी उच्चशिक्षित झाले. हे त्यांच्याच दूरगामी विचारांचे फळ आहे.

वयाच्या १०४ व्या वर्षातही त्यांचे मन आणि स्मरणशक्ती अत्यंत तल्लख होती. समाजवादी चळवळीचे ते चालतेबोलत विश्वकोश होते. त्यांचे आयुष्य म्हणजे संघर्ष, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेचा अखंड दीप होता. त्यांच्या पाऊलखुणा भावी पिढ्यांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहतील. अशा निरलस सद्गृहस्थाने २७ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १०.००वाजता अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.....

शब्दांकन-
श्री. प्रमोद आवारी
धामणगाव आवारी, अकोले

दैनिक युवावार्ता परिवार, संगमनेर

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥ संगमनेर- अकोले तालूका स्नेहवर्धक संघटना, मुंबई

महाराष्ट्र शासन
अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर-२ यांचे कार्यालय.
जुने जिल्हाधिकारी कार्यालय, जी.पी.ओ. रोड, जि. अहिल्यानगर ४१४००१
Email ID: excisesupdtahilyanagar@gmail.com



जाहीर नोटीस

अहिल्यानगर-२ अहिल्यानगर जिल्हयातील सन २०२६-२७ या कालावधीकरीता ताडी दुकानांचे जाहीर फेर ई लिलाव-नि-निविदा प्रक्रिया राबवून ताडी दुकानाकरीता अनुज्ञप्त्या मंजूर करणेबाबत

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर-२ अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकाने ताडी वर्ष २०२६-२७ करिता जाहीर फेर ई लिलाव-नि-निविदा पध्दतीने देण्यात येणार आहेत. अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकानांचा फेर जाहीर ई लिलाव-नि-निविदा दि.२९/१०/२०२६ ते दि. २०/११/२०२६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेत-स्थळावर प्रकाशित करण्यात आलेली आहे. तसेच ताडी दुकानाचा फेर जाहीर ई-लिलाव दि. २०/११/२०२६ रोजी होणार असून याची सर्व इच्छूक निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

ताडी दुकानाची यादी, इतर नियम फेर ई लिलाव-नि-निविदा बाबतच्या अटी व शर्ती इत्यादी बाबतची सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in व http://www.ahmednagar.nic.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. तसेच अधिक माहिती आवश्यक असल्यास अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर-२ यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

(ऋषिकेश झाळे)
अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर-२

ठिकाण :- अहिल्यानगर.
दिनांक :- २९ /१०/२०२६

युवावार्ता
छोट्या जाहिराताठी संपर्क करा
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

पाहिजेत
ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर
- संपर्क -
8308015324

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ मृत्यू नोंद/६४१/२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
दिनांक – २८/१०/२०२६

जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. मिनाक्षी शांताराम घोडके, रा. संगमनेर** यांनी **दिनांक २३/१०/२०२६** रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. संगमनेर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची **सुन नामे खुशीया जाकीरखान पठाण** यांचा **मृत्यू** मौजे **संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे दिनांक २४/०२/२०२५ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **मृत्यू** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील **जागा भरणे आहे**
सेल्स एक्झीक्युटिव -१ एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ अनुभव असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - **9822399371/ 7879708888**

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर
(टॅली ज्ञान अवश्यक)
जागा -१
आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
- **बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४**
- **कार्यालयीन प्रशासक – १**
- **आयटी प्रोफेशनल – १**
- **संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १**

पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

फ्लॅट विकणे आहे!
फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

प्रो. रु.
रजि. नं.
ॲड. बी. आर. राऊत
फौजदारी न्यायालय कोर्ट नं.४
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस
मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर
क्रि. चौ.अर्ज नं. ६२९/२०२६ यांचे कोर्टात

तुळशीराम सावळेराम जाधव ---- अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक मौजे घुलेवाडी ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदाराचे वडील सावळेराम रावजी जाधव यांचा मृत्यू दि. १३.०१.२००५ रोजी मौजे घुलेवाडी ता संगमनेर जि अ नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. अर्जदार याचे वडिलांची मृत्यूची नोंद ग्रामपंचायत घुलेवाडी ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं. ४ यांचे कोर्टात क्रि.चौ.अ.नं.६२९/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. १३.०१.२००५ रोजीचे मृत्यूची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील यांचा मृत्यू दि. १३.०१.२००५ रोजी मौजे घुलेवाडी, ता संगमनेर जि अ.नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. १६.११.२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या मृत्यूची नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल

सही तयार करणार — शिक्का — हुकूमावरून सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायलय कोर्ट नं. ४ संगमनेर

प्रो. रु.
रजि. नं.
ॲड. बी. आर. राऊत
फौजदारी न्यायालय कोर्ट नं.३
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस
मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर
क्रि. चौ.अर्ज नं. ५८३/२०२६ यांचे कोर्टात

बाबासाहेब मारूती पानसरे ---- अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक मौजे घुलेवाडी ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदाराची बहिण पद्माबाई मारुती पानसरे हिचा जन्म दि. ०१.०१.१९६६ रोजी मौजे घुलेवाडी ता संगमनेर जि अ. नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे.. अर्जदार याचे जन्माची नोंद घुलेवाडी, ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं. २ यांचे कोर्टात क्रि.चौ.अ.नं.-५८३/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. ०१.०९.१९६६ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदाराची बहिण पद्माबाई मारुती पानसरे हिचा जन्म दि. ०१.०९.१९६६ रोजी मौजे घुलेवाडी ता संगमनेर जि अ नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. १६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

सही तयार करणार — शिक्का — हुकूमावरून सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायलय कोर्ट नं. ३ संगमनेर

प्रो. रु.
रजि. नं.
ॲड. बी. आर. राऊत
फौजदारी न्यायालय कोर्ट नं.३
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस
मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर
क्रि. चौ.अर्ज नं. ५७८/२०२६ यांचे कोर्टात

आनंदा साहेबराव सोनवणे ---- अर्जदार
विरुध्द
मा. ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय घुलेवाडी ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदार याची बहिण नामे ज्योती साहेबराव सोनवणे हिचा मृत्यु दि. २६/०७/२०११ रोजी मौजे घुलेवाडी, ता. संगमनेर, जि.अ. नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. अर्जदार याचे बहिणीचे मृत्युची नोंद ग्रामपंचायत घुलेवाडी ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं.३ यांचे कोर्टात क्रि.चौ.अ.नं.५७८/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. २६/०७/२०११ रोजीचे मृत्युची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याची बहिण नामे ज्योती साहेबराव सोनवणे हिचा मृत्यु दि. २६/०७/२०११ रोजी मौजे घुलेवाडी, ता. संगमनेर, जि.अ.नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. १६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

सही तयार करणार — शिक्का — हुकूमावरून सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायलय कोर्ट नं. ३ संगमनेर

SR THORAT — **पाहिजेत** — SR THORAT

मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक

आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे.
साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

१.क्रं	गाडीचा प्रकार
१	छोटा हत्ती
२	टाटा झिप
३	महिंद्रा जीतो
४	मारुति सुजुकी सुपर कॅरि

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस– एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७



शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात चारा उत्पादन वाढविण्यासाठी नियोजन करा-जिल्हाधिकारी

अहिल्यानगर- जिल्ह्यातील संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध होण्यासाठी आतापासूनच व्यापक नियोजन करावे. जिल्ह्यात जास्तीत जास्त चारा उत्पादन घेण्यावर भर देतानाच उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती आणि विविध शासकीय योजनांचा प्रभावी वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील चारा नियोजनाबाबत आढावा बैठक (दि ०२) पार पडली. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी (व्हिसीद्वारे), निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी चारा उत्पादन वाढविण्यासाठी विविध पर्यायांचा आढावा घेतला. जिल्ह्यातील धरण क्षेत्रात पाणी कमी झाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या गाळपेर जमिनीचा चारा लागवडीसाठी उपयोग करता येईल का, याचा संबंधित विभागांनी अभ्यास करावा. तसेच कृषी विभागामार्फत वितरित करण्यात येणाऱ्या मिनी किटच्या माध्यमातून आणि बीजगुण केंद्रांच्या सहाय्याने चारा लागवडीचे नियोजन करता येईल का, याची तपासणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

व्ही.बी.जी. रामजी योजनेअंतर्गत सामूहिक तसेच वैयक्तिक स्वरूपात चारा



लागवडीचे प्रकल्प राबविता येतील का, याचा विचार करून प्रत्येक तालुक्यात असे प्रकल्प हाती घेण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. यामुळे स्थानिक पातळीवर चारा उत्पादन वाढविण्यास मदत होईल. तसेच चारा उत्पादनासाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांचा समन्वयाने उपयोग करण्याचेही त्यांनी सूचित केले.

कमी जागेत आणि नियंत्रित पद्धतीने चारा उत्पादन घेण्यासाठी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या जनावरांच्या बाजारात हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक मॉडेल उभारण्याबाबत नियोजन करावे. या माध्यमातून शेतकरी आणि पशुपालकांना या तंत्रज्ञानाची माहिती व प्रत्यक्ष अनुभव मिळेल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील साखर कारखान्यांमधून उपलब्ध होणाऱ्या बगॅस तसेच मळीचा पुढील वर्षी पशुधनाच्या खाद्यासाठी उपयोग करता येईल का, याबाबतही संबंधित विभागांनी नियोजन करावे. उपलब्ध उपपदार्थांचा योग्य पद्धतीने वापर करून पशुखाद्याची उपलब्धता वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.


शेतीच्या बांधावर रंगणार पुस्तक प्रकाशन सोहळा

डॉ. एल. के. गिते लिखित 'मातीचा धनी' पुस्तकाचे १२ नोव्हेंबरला सोनोशी येथे प्रकाशन; कृषी विज्ञान सेवा पुरस्कारांचेही वितरण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : पुस्तक प्रकाशन म्हटले की सभागृह आणि व्यासपीठ असे चित्र डोळ्यांसमोर येते. मात्र, मातीशी नातं सांगणाऱ्या एका पुस्तकाचा प्रकाशन सोहळा थेट शेतीच्या बांधावर रंगणार आहे. शेतीत घाम गाळणाऱ्या हातांच्या, धाडसी निर्णयांच्या आणि मातीशी इमान राखणाऱ्या जीवनमूल्यांच्या साक्षीने 'मातीचा धनी - गोष्ट एका धाडसी बापाची' या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता सोनोशी येथे होणार आहे.

डॉ. एल. के. गिते लिखित आणि पेन पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रकाशित या पुस्तकातून कष्टकरी बापाच्या जीवनप्रवासातील संघर्ष, धाडस, कुटुंबनिष्ठा आणि मातीशी असलेले अतूट नाते उलगडणार आहे. शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून ती संस्कारांची, स्वाभिमानाची आणि पिढ्यान्पिढ्या जपल्या जाणाऱ्या मूल्यांची शिदोरी आहे, हा आशय पुस्तकातून



वाचकांसमोर येणार आहे. ऐंशीच्या दशकातील गावगाडा, कौटुंबिक आठवणी, आयुष्यातील खडतर प्रसंग आणि पुढील पिढीला मिळालेला संस्कारांचा वारसा यांचे चित्रणही या पुस्तकात करण्यात आले आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांची प्रस्तावना लाभली आहे. 'एक भाकर तीन चुली' या कादंबरीचे लेखक देवा झिंजाड यांनी पुस्तकाची पाठराखण केली आहे. तसेच शिक्षणतज्ज्ञ व माजी कुलगुरू एस. बी. निमसे, कुलगुरू विलास खर्चे आणि लेखक व कुलगुरू पंडित विद्यासागर यांनी पुस्तकाबाबत अभिप्राय दिले आहेत.

स्व. कारभारी (दादा) गिते यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित या कार्यक्रमात कृषी विज्ञान सेवा पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. शेती, कृषी संशोधन आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा या वेळी गौरव करण्यात येईल. प्रसिद्ध कवी व व्याख्याते नितीन चंदनशिवे यांचे 'शेती, युवक आणि कुटुंब' या विषयावर व्याख्यानही होणार आहे.

मातीशी नाळ जपणाऱ्या माणसाची कहाणी मांडणारे पुस्तक आणि त्याच मातीच्या सान्निध्यात होणारे त्याचे प्रकाशन, हा या सोहळ्याचा विशेष ठरणार आहे. गिते परिवार, कारभारी दादा शिवार प्रतिष्ठान आणि पेन पब्लिशिंग हाऊस यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

घुलेवाडीत चोरट्यांचा धुमाकूळ; एकाच रात्री ५ ते ६ ठिकाणी घरफोडीचे प्रयत्न, घटना सीसीटीव्हीत कैद

युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी परिसरात चोरट्यांनी अक्षरश: धुमाकूळ घातला असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. २ नोव्हेंबरच्या रात्री परिसरातील तब्बल ५ ते ६ ठिकाणी घरफोडी आणि घरफोडीचे प्रयत्न झाल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, बंद घरांना लक्ष्य करत चोरट्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने चोरी केल्याचे समोर येत आहे.

घुलेवाडीतील कारखाना माळ आणि अमृतनगर परिसरात तीन कुटुंबांच्या घरात चोरट्यांनी प्रवेश करून सोने, चांदी आणि रोख रकमेसह जवळपास १ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, निसर्ग कॉलनी परिसरातही मध्यरात्री तीनच्या सुमारास तीन चोरट्यांनी एका घराचे कुलूप तोडून घरफोडी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा संपूर्ण प्रकार घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. संबंधित नागरिकाने चोरट्यांचा हा व्हिडिओ प्रसारित केल्यानंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेतील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे चोरट्यांकडे हत्यारे असल्याचे



सीसीटीव्ही दृश्यांवरून आणि नागरिकांनी दिलेल्या माहितीतून समोर येत आहे. त्यामुळे या टोळीचा शोध घेण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे.

एकीकडे दुष्काळी परिस्थिती आणि दुसरीकडे ऊसतोड हंगामाला सुरुवात झाल्याने अनेक नागरिक बाहेरगावी जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत बंद घरांना चोरटे लक्ष्य करण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे घुलेवाडी परिसरात रात्रीची पोलिस गस्त वाढविण्याची आणि संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. ●मात्र, केवळ पोलिस यंत्रणेवर अवलंबून न राहता घुलेवाडी ग्रामपंचायत आणि स्थानिक नागरिकांनी एकत्र येऊन सीसीटीव्ही यंत्रणा, रात्रीची गस्त आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांसाठी तातडीने बैठक घेणे आवश्यक आहे.

प्रश्न एवढाच आहे की, घुलेवाडीत आणखी एखादी मोठी घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? नागरिकांच्या घरादाराची आणि जीविताची सुरक्षा करण्यासाठी पोलिस प्रशासन व ग्रामपंचायत ठोस पावले कधी उचलणार?

पान १ वरून

जिल्हा बँकेवर सहकार..

साथ आणि निवडणुकीपूर्वीच झालेल्या या बिनविरोध निवडींमुळे सहकार विकास आघाडीने विजयाचा भक्कम पाया रचला. यामुळे निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच आघाडीचे पारडे जड असल्याचे चित्र निर्माण झाले होते. प्रत्यक्ष निवडणुकीतही सहकार विकास आघाडीने आपले वर्चस्व कायम राखले. काळे आशुतोष अशोकराव, नागवडे अनुराधाताई राजेंद्र, वाघ संगीता जयंत, पिचड वैभव मधुकर, जवळे करभारी झुंबर, सांगळे गणपतराव पुंजाजी आणि तनपुरे प्राजक्त प्रसाद यांनी विजय संपादन केला. कृषी, बिगरशेती, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि महिला मतदारसंघांमध्ये आघाडीच्या उमेदवारांना मिळालेला भक्कम पाठिंबा हा विजयाचा महत्त्वाचा पैलू ठरला. विविध मतदारसंघांत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत मिळविलेल्या यशामुळे मतदारांचा कौल किती निर्णायक होता, हे स्पष्ट झाले.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सहकार विकास आघाडीने मिळविलेल्या या यशामुळे आगामी राजकीय समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विखे-थोरात यांच्यातील समन्वय, गडाख-घुले यांची साथ आणि जिल्ह्यातील विविध नेत्यांची एकत्रित ताकद यामुळे सहकार विकास आघाडी अधिक मजबूत झाल्याचे चित्र आहे. या ऐतिहासिक विजयाबद्दल आघाडीतर्फे जिल्ह्यातील शेतकरी, बँकेचे सभासद, मतदार, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. मतदारांनी दाखविलेला विश्वास हीच आघाडीची खरी ताकद असल्याची भावना नेत्यांनी व्यक्त केली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार चळवळीचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे १७ जागांवरील विजय हा केवळ राजकीय यश नसून मोठ्या जबाबदारीची जाणीव करून देणारा कौल आहे. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, सहकारी संस्थांचे सक्षमीकरण, बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम करणे आणि ग्रामीण विकासाला गती देणे, ही आगामी काळातील प्रमुख आव्हाने असणार आहेत. सर्वांना सोबत घेऊन सहकार क्षेत्राच्या विकासासाठी काम करण्याची भूमिका आघाडीतर्फे व्यक्त करण्यात आली आहे.

१८ पैकी १७ जागांवर विजय, बिनविरोध निवडींची ताकद आणि मतदारांचा निर्णायक कौल या माध्यमातून सहकार विकास आघाडीने अहिल्यानगर जिल्हा बँकेवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

संगमनेर नगरपरिषदेचे एक पणती स्वच्छतेची अभियान

मा. मंत्री थोरात, सौ. दुर्गाताई तांबे, आ. तांबे यांच्या उपस्थितीत स्वच्छतेची जनजागृती

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर नगरपरिषदेने नागरिकांना चांगल्या सुविधा देण्याबरोबर राज्य व राष्ट्रीय पातळीवर स्वच्छतेमध्ये सौ.दुर्गाताई तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पुरस्कार मिळवले आहेत. दीपावलीच्या पार्श्वभूमीवर नगरपालिकेकडून एक पणती स्वच्छतेची या जनजागृती रॅलीचे बुधवार दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वा. सौ.दुर्गाताई तांबे यांच्या शुभहस्ते यशोधन कार्यालयापासून आयोजन करण्यात आले असल्याची माहिती नगराध्यक्ष डॉ.सौ. मैथिलीताई तांबे यांनी दिली आहे.

संगमनेरच्या सुंदर भविष्याच्या बाबत माहिती देताना नगराध्यक्ष डॉ.मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार



सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना चांगल्या सुविधा देण्याबरोबर पायाभूत व शाश्वत विकासाच्या योजना राबवल्या जाणार आहेत. याचबरोबर स्वच्छतेमध्ये सर्व नागरिकांना बरोबर घेऊन संगमनेर शहराला स्वच्छतेतून समृद्धीकडे नेण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहे.

दीपावलीच्या निमित्ताने बुधवार दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता यशोधन कार्यालय येथून एक पणती स्वच्छतेची हे स्वच्छतेच्या जनजागृतीचे अभियान सुरू करण्यात येणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात,मा.आ.डॉ.सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे हे उपस्थित राहणार असून संगमनेर शहराच्या पहिल्या महिला नगराध्यक्ष सौ.दुर्गाताई तांबे यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ होणार आहे. यावेळी डॉ.जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख सर्व सभापती तसेच नगरसेवक, नगरसेविका व सर्व माजी नगराध्यक्ष, व्यापारी, पदाधिकारी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी संगमनेरच्या सुंदर भविष्याच्या दृष्टीने होत असलेल्या स्वच्छतेच्या जनजागृती एक पणती स्वच्छतेची या रॅलीमध्ये शहरातील सर्व नागरिक महिला व युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि मुख्याधिकारी डॉ.दयानंद गोरे व नगरपरिषदेच्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी केले आहे.

SBI बँकेत अकोले हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत अकोले हॉस्पिटल, अकोले मेडिकल फाऊंडेशन, अकोले मेडिकल फार्मा आणि स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये तज्ज्ञ फिजिशियन, मधुमेह व रक्तदाब तज्ज्ञ डॉ. संजीवनी अरगडे **(M.B.B.S, DNB** - जनरल मेडिसिन) यांनी नागरिकांची रक्तातील साखर, रक्तदाब आणि सांधेदुखी यांसह विविध आजारांची मोफत तपासणी करून उपचारांबाबत योग्य मार्गदर्शन केले. आरोग्य सुदृढ असेल तरच आपण कोणतीही गोष्ट उत्साहाने करू शकतो आणि आपले आयुष्यमान वाढवू शकतो, असा विश्वास डॉ. अरगडे यांनी याप्रसंगी नागरिकांना दिला.

अकोले हॉस्पिटल, अकोले मेडिकल फाऊंडेशन, अकोले फार्माच्या वतीने नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा शिबिरांचे सातत्याने आयोजन केले जाते. या शिबिराचा मुख्य उद्देश नागरिकांना आरोग्याविषयी माहिती देणे आणि हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या शासकीय व खाजगी योजनांचा लाभ मिळवून देणे हा होता. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन



आरोग्य योजना, नोंदणीकृत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोफत उपचार, मुख्यमंत्री सहायता निधी आणि विविध नामांकित कंपन्यांच्या विमा (इन्शुरन्स) पॉलिसी यासोबतच हॉस्पिटलमध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब, थायरॉईड, हृदयविकार, दमा, किडनी व लिव्हरचे आजार, मेंदूचे आजार (लकवा, फिट्स), सांधेदुखी आणि संसर्गजन्य आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार केले जातात.

या शिबिराच्या संकल्पनेचे प्रणेते अकोले हॉस्पिटलचे संस्थापक डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे आणि अकोले मेडिकल फाउंडेशन, अकोले फार्माच्या संस्थापक सौ. रूपाली प्रकाश वाकचौरे यांची शिबिराला प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर अजय भुजबळ, बँक कर्मचारी वंदना वर्पे, जालिंदर आखाडे, अजय काळे, आदित्य थोरात, देवकांत सोनवणे, रूपाली लांडगे आणि चंदू मेंगाळ उपस्थित होते. शिबिराचे नियोजन व व्यवस्थापन डॉ. गायत्री दिघे (ठचज), शुभम दातखिळे, अर्चना डावरे, शांभवी देशमुख, काजल खरात, धनश्री मेंगाळ, सोनाली शिंदे, प्रशांत चव्हाण आणि संकेत जाधव यांनी यशस्वीरित्या सांभाळले. ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचावी यासाठी अकोले हॉस्पिटल नेहमीच अग्रेसर राहील, असा विश्वास यावेळी संयोजकांनी व्यक्त केला. शिबिराला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला आणि हॉस्पिटलच्या या सामाजिक उपक्रमाबद्दल आभार मानले.

पान १ वरून

संगमनेरमध्ये..

१५ लाख रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारे एकूण २५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी साजीद पाशा मेहबुब शेख (वय ४२, रा. भारतनगर, म्हैसूर, कर्नाटक) याच्याविरुद्ध प्राण्यांना निर्दयतेने वागणूक देण्यास प्रतिबंधक अधिनियम कलम ३ व ११ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सुधारित २०१५ मधील कलम ५ (अ) व ९ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कॉन्स्टेबल बाबासाहेब केशव शिरसाठ यांनी याप्रकरणी फिर्याद दिली असून, दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे २ वाजून ३९ मिनिटांनी गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पोलीस निरीक्षक प्रविण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश शिंदे करीत आहेत. गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक आणि कत्तलीच्या उद्देशाने होणाऱ्या हालचालींवर पोलिसांनी कारवाई केल्याने परिसरात या घटनेची चर्चा सुरू झाली आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

अंजली
होम अप्लायन्सेस सर्व्हिस
प्रो.प्रा दिपक दुस्सा
Mo. 9970256292
7588540906
तत्काळ दुरुस्ती सेवा | चांगल्या प्रतिची हमी | योग्य दरात सेवा | घरी येऊन दुरुस्ती
आमच्या कडे सर्व प्रकारच्या घरगुती वापरातील वस्तु मिक्सर, फॅन,गॅस,गिझर,गॅस शेगडी,भट्टी इतर वस्तु विक्री व दुरुस्ती करुन मिळेल.
अकोलकर कॉम्प्लेक्स, दिवेकर गॅस समोर मालदाड रोड, संगमनेर

चौथी-पाचवीच्या विद्यार्थ्यांना पाढेही येईनात, आमदार खताळ संतापले

गिऱ्हेवाडी जिल्हा परिषद शाळेला अचानक भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्याच्या पठारभागातील हिवरगाव पठार अंतर्गत येणाऱ्या गिऱ्हेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला आमदार अमोल खताळ यांनी अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली. चौथी आणि पाचवीच्या विद्यार्थ्यांना आठ आणि नऊचे पाढे विचारले असता काही विद्यार्थ्यांना ते सांगता आले नाहीत. विद्यार्थ्यांची ही शैक्षणिक स्थिती पाहून आमदार खताळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. 'विद्यार्थ्यांना पाढे येत नसतील, तर शाळेत शिक्षक नेमके काय शिकवतात?' असा थेट सवाल त्यांनी मुख्याध्यापक आणि शिक्षकांना केला.

आ. खताळ शाळेत दाखल झाल्याचे समजताच शिक्षक आणि मुख्याध्यापकांची एकच तारांबळ उडाली. शाळेतील वर्गांमध्ये जाऊन त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना गणिताचे पाढे विचारून त्यांच्या मूलभूत शैक्षणिक ज्ञानाची चाचपणी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना पाढे व्यवस्थित सांगता आले, तर काही विद्यार्थ्यांना आठ आणि नऊचे पाढेही सांगता आले नाहीत. चौथी-पाचवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना साधे पाढे येत नसतील, तर त्यांना शाळेत नेमके काय शिकवले जाते, असा सवाल करत त्यांनी शिक्षकांना खडे बोल सुनावले. शासन शिक्षकांना नियमित वेतन देत असताना विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे, त्यांचे मूलभूत ज्ञान पक्के करणे आणि शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा घडवून आणणे ही शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांना प्राथमिक स्वरूपाचे गणितही अवगत नसेल तर अध्यापनाच्या पद्धतीत सुधारणा करण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, त्यांना शालेय स्तरावर आवश्यक असलेले मूलभूत ज्ञान अवगत व्हावे, यासाठी शिक्षकांनी अधिक गांभीर्याने आणि जबाबदारीने अध्यापन करावे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचनाही आमदार खताळ यांनी यावेळी केल्या. आमदारांच्या या अचानक भेटीमुळे गिऱ्हेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अध्यापनाचा दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सस्नेह निमंत्रण ..!
कृषी पंढरीचे वारकरी...
स्व.कारभारी (दादा) चिमाजी गिते
यांचे
पाचवे पुण्यस्मरण
निमित्त
व्याख्यान, कृषी विज्ञान सेवा पुरस्कार वितरण, पुस्तक आणि दिनदर्शिका प्रकाशन
डॉ. एल. के. गिते लिखित आणि पेन पब्लिशिंग हाऊस प्रकाशित
मातीचा धनी - गोष्ट एका धाडसी बापाची
या पुस्तकाचे प्रकाशन आणि पुरस्कार वितरण
प्रमुख व्याख्याते :
दंगलकार मा. नितीन चंदनशिवे (प्रसिद्ध कवी, व्याख्याते)
विषय - शेती, युवक आणि कुटुंब
प्रमुख उपस्थिती
मा. बाळासाहेब थोरात
मा.कृषी व महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य
- कृषी विज्ञान सेवा पुरस्कार्थी -
डॉ. बी.टी. पाटील, कांदा वाण पैदासकार, राहुरी कृषी विद्यापीठ
डॉ. किशोर शिंदे, संस्था शास्त्रज्ञ आणि संचालक कृषी परिषद,पुणे
प्रा. तुषार उगले, कीटक शास्त्रज्ञ,के.के. वाघ कृषी महाविद्यालय,नाशिक
श्री. विठ्ठल बा. ढेरंगे, प्रगतिशील शेतकरी, खंडेरायवाडी,संगमनेर
सौ. प्रमिला ब. फंड, प्रगतिशील शेतकरी, सारोळा अडवाई, पारनेर
कै. रामभाऊ इंदापुरे, प्रगतिशील शेतकरी, रांजणगाव (खुर्दो),पैठण
श्री. वीरेंद्र थोरात, संचालक विश्व हायटेक नर्सरी,वीरगाव,अकोले
सौ. पल्लवी बोंगे-इंगोले, यू ट्यूबर, पंढरपूर
श्री. दीपक जाधव, हवामान तज्ज्ञ, चांदवड,नाशिक
दिनदर्शिका प्रकाशन
सन्माननीय उपस्थित मान्यवर
'शिवार फार्म'
या नव्या वास्तुचा गृहप्रवेश आयोजित केला आहे तरी आपण या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे, ही सस्नेह विनंती.
टिप : कृपया भेटवस्तू व पुष्पगुच्छ आणू नये.
वार व वेळ : गुरूवार, दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता
ठिकाण : गिते वस्ती, सोनोशी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
आपले विनित - गिते परिवार, कारभारी दादा शिवार प्रतिष्ठाण व पेन पब्लिशिंग हाऊस
सहकार्य- दैनिक युवावार्ता परिवार, संगमनेर

संगमनेर नगरपालिकेत मतदार यादीवरून राजकीय राडा

परस्परविरोधी फिर्याद, १३ जणांवर गुन्हे दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : मतदार यादीतून नाव वगळल्याच्या कारणावरून संगमनेर नगरपालिकेच्या प्रांगणात ३ नोव्हेंबर रोजी राजकीय संघर्षाचा भडका उडाला. प्रभाग क्रमांक पाचमधील मतदार यादीच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधी गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये लक्ष्मण बाबा मंदिरासमोर जोरदार बाचाबाची झाली. या वादाचे रूपांतर शिवीगाळ, धक्काबुक्की आणि लाथाबुक्क्यांच्या मारहाणीत झाले. यावेळी जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्याचा आरोप आहे. झटापटीत 'आय लव्ह यू संगमनेर'चे सुरक्षेसाठी उभारलेले स्तंभही उखडून फेकण्यात आल्याचे दिसून आले.

या प्रकरणी वैष्णव राजकुमार मुर्तडक यांच्या फिर्यादीवरून शिवाजी अभंग, सचिन घाडगे, रवींद्र म्हस्के, राहुल म्हस्के, सचिन ढोले, राजू मंडलिक आणि नीलेश गाडेकर अशा सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दुसऱ्या बाजूने शिवाजी रामनाथ अभंग यांच्या फिर्यादीवरून विश्वास मुर्तडक, वैष्णव मुर्तडक, यशवंत मुर्तडक, अमोल झांबरे, बबन मुर्तडक आणि आशिष कोठवळ अशा सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दोन्ही गटांच्या परस्परविरोधी फिर्यादींवरून भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

एफडीएची मोठी कारवाई लाखोंचा अन्नसाठा जप्त

मुंबई (वृत्तसंस्था)

- अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) १ ते ३ नोव्हेंबरदरम्यान राज्यभरातील विशेष तपासणी मोहिमेत प्रतिबंधित अन्नपदार्थांसह सुमारे ४५ लाख रुपये किमतीचा अन्नसाठा जप्त केला. कारवाईत पाच आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, तीन गुन्हे दाखल करून दोन जणांना अटक करण्यात आली. कारवाईदरम्यान चेंबूर येथे सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोडवर तानिया ट्रॅव्हल्सच्या लक्झरी बसमधून नियंत्रित तापमानाची व्यवस्था नसताना आणि अस्वच्छ परिस्थितीत अन्नपदार्थांची वाहतूक केली जात असल्याचे आढळले. आरोग्याला होणारा संभाव्य धोका तसेच अन्नपदार्थांमध्ये भेसळ असण्याची शक्यता लक्षात घेऊन बसमधील ११ लाख ११ हजार १८४ रुपयांचा ४ हजार २ किलो स्वीट हलवा आणि मिठाईचा साठा जप्त केला. दरम्यान, कोकण विभागात ४६ हजार ४९० रुपये किमतीचा व नाशिक विभागात ११ लाख ८ हजार ९० रुपये किमतीचा प्रतिबंधित अन्नसाठा जप्त करण्यात आला. व्यवसाय बंद ठेवण्याची नोटीस अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन आणि तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या पार्श्वभूमीवर एफडीएने पाच आस्थापनांविरोधात परवाना निलंबनाची कारवाई केली. यवतमाळ येथील न्यू शेगाव कचोरी, पुरोहित बिकानेर मिठाईवाला, अकोला येथील मीरा इंटरप्रायजेस, बुलढाणा येथील प्रकाश फूड प्रॉडक्टस, वाशिममधील सद्गुरु स्वीट मार्ट यांचे परवाने निलंबित करण्यात आले. यवतमाळ येथील पुरोहित राजस्थानी मिठाई या आस्थापनाला नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत व्यवसाय बंद ठेवण्याची नोटीस बजावण्यात आली.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
हेल्थ इंडिया इन्शुरन्स
FHPL हेल्थ इन्शुरन्स
इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
बजाज आलियांज इन्शुरन्स
एसबीआय जनरल इन्शुरन्स
ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
मेडसेव टीपीए प्रा.लि.
जेनिन्स इंडिया टीपीए लि.
ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
टाटा एआयजी इन्शुरन्स
रिलायन्स जनरल इन्शुरन्स
मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
नॅशनल इन्शुरन्स कं.
न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
युनायटेड हेल्थकेअर लि.
Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
एम.डी.इंडिया हेल्थकेअर
विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दुर्गेश
टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग: अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग: सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग: मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट: स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25